दैनिक **महिला संवाद** MAHILA SANVAD

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 227, Marathi Daily Friday, Date - 06 March 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २२७ वा | मराठी दैनिक | शुक्रवार दि. ०६ मार्च २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

# ई-चलनविरोधात वाहतूकदारांचा बेमुदत संप

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ई-चलन प्रणाली आणि पोलिसांच्या कथित डिजीटल दरोड्याविरोधात राज्यातील विविध वाहतूकदार संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. ५ मार्चच्या मध्यरात्रीपासून महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटीने बेमुदत संपाची हाक दिली आहे. या बेमुदत संपामुळे मुंबई, पुणे आणि ठाणे या प्रमुख शहरांमधील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचे पाहायला मिळत आहे.

ठाण्यातील मुलुंड जकात नाका परिसरात आज सकाळपासूनच तणावाचे वातावरण पाहायला मिळाले. बस ओनर सेवा संघ आणि इतर संघटनांनी हातात काळे झेंडे घेऊन आपल्या बस गाड्या रस्त्याच्या मधोमध उभ्या केल्या, ज्यामुळे चक्का जाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यावेळी आंदोलकांनी पोलीस उपायुक्त प्रशांत कदम यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे. सध्या नवघर पोलिसांनी संपूर्ण परिसरात मोठा बंदोबस्त तैनात केला आहे.

राज्यातील ई-चलन प्रणाली विरुद्ध पुण्यातही चालक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज सकाळी ११ वाजल्यापासून रिक्षा संघटना आणि मालवाहतूकदार संयुक्त कृती समितीने जोरदार निदर्शने केली. ई-चलनाच्या माध्यमातून केली जाणारी बेकायदेशीर वसुली थांबवावी, या मागणीसाठी पुण्यात दोन तास रिक्षा आणि प्रवासी मालवाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात आली होती.

मुंबईतील आझाद मैदानावर सुमारे ५०० ते १००० वाहतूक व्यावसायिक एकत्र येऊन शक्तीप्रदर्शन करत आहेत. या आंदोलनात केवळ जड ट्रकच नाही, तर स्कूल बस, खाजगी ट्रॅव्हल्स, टेम्पो, टॅक्सी आणि रिक्षा संघटनांनीही सहभाग नोंदवला आहे. एकाच चुकीसाठी दिवसातून अनेक वेळा ई-चलन फाडले जाते. तसेच पार्किंगची सुविधा नसतानाही दंड




आकारला जातो, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले आहे.

याप्रकरणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासोबत झालेली उच्चस्तरीय बैठक निष्फळ ठरल्याचे समितीने सांगितले आहे. सरकार केवळ तोंडी आश्वासने देत आहे. जोपर्यंत याचा अधिकृत जीआर निघत नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही, असा इशारा वाहतूकदारांनी दिला आहे. आता या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय तोडगा काढतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जर आज याचा ठोस निर्णय झाला नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला आहे.

या संपात स्कूल बस असोसिएशन सहभागी झाले आहे. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे, विशेषतः बोर्ड परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल होण्याची शक्यता आहे. तसेच यामुळे दूध, भाजीपाला आणि इंधन पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. यावर पुढील ४८ ते ७२ तासांत परिणाम होऊ शकतो. टॅक्सी आणि रिक्षाच्या कमतरतेमुळे मुंबई-पुण्यातील नोकरदारांना प्रवासासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे.

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## थोडक्यात...

### आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थिती : अडकलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी केंद्र सरकारसोबत समन्वय

**मुंबई । प्रतिनिधी**

आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तेथे अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी राज्य शासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत. विविध देशांमध्ये वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या संपर्कात राज्य शासन असून त्यांच्या मदतीसाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच केंद्र सरकारसोबतही समन्वय ठेवून आवश्यक ती मदत व सहकार्य मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून संबंधित दूतावास, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि इतर यंत्रणांशी सातत्याने संपर्क साधत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री गिरीश महाजन यांना या संपूर्ण समन्वय कार्यात लक्ष घालण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र सरकारकडूनही महाराष्ट्र शासनाला सर्वतोपरी मदत केली जात असून अडकलेल्या नागरिकांच्या सुरक्षित परतीसाठी आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे. दुबईतील इंडियन पीपल्स फोरम यांच्या सहकार्याने महाराष्ट्र शासनाने मदतीसाठी एक विशेष व्हॉटसप क्रमांक जारी केला आहे. आखाती देशांमध्ये अडचणीत असलेल्या किंवा मदतीची आवश्यकता असलेल्या नागरिकांनी व्हॉटसप क्रमांकाद्वारे : +९७१५० ३६५ ४३५७ यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पुणे शहरात गुंगीकारक औषधांची विक्री करणाऱ्यावर कारवाई

**मुंबई । प्रतिनिधी**

पुणे शहरात विनापरवाना व डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय गुंगीकारक औषधे नशा करण्यासाठी तसेच बेकायदेशीर खरेदी-विक्रीच्या उद्देशाने औषधांचा साठा बाळगल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य चित्रा वाघ यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य अभिजीत वंजारी यांनी उपप्रश्न उपस्थित केला. राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, या प्रकरणात पाच जणांवर आरोप निश्चित करण्यात आला असून त्यापैकी दोघांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित तीन आरोपींचा शोध सुरू आहे. तसेच या पाचही आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेली औषधे ही प्रमाणित असूनती कोणत्याही स्थानिक मेडिकल स्टोअरमधून विकत घेतलेली नाहीत.

तपासादरम्यान संबंधित औषधांचा पुरवठा बाहेरच्या राज्यातून झाल्याची माहिती पुढे आली असून पुरवठा साखळीचा तपास सुरू आहे. दरम्यान, पुणे शहरात बनावट नशेची औषधे तयार करणारी कोणतीही कंपनी आढळून आलेली नाही. पुणे शहरासह राज्यभरात अशा प्रकारच्या औषध विक्री संदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन विभागाकडून नियमित कारवाई केली जात असल्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी यावेळी सांगितले.

## महापालिकेच्या शहर अभियंता पदाच्या विविध विभागांच्या कार्यभाराचे तात्पुरता स्वरूपात वाटप

**पिंपरी । प्रतिनिधी**



पिंपरी चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम हे महापालिका सेवेतून २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे शहर अभियंता निकम यांच्या कडील विविध विभागांचा कार्यभार तात्पुरता स्वरूपात महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता मनोज सेठिया आणि सुनील भागवानी यांच्याकडे सोपवण्यात आला आहे,याबाबतचे आदेश आज निर्गमित केलेले आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने काढण्यात आलेल्या आदेशानुसार मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांच्याकडे त्यांच्याकडील सध्याच्या पाणी पुरवठा व प्रकल्प विभागासह स्थापत्य विभागाच्या अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

सह शहर अभियंता मनोज सेठिया यांच्याकडे त्यांच्याकडील सध्याच्या स्थापत्य मुख्य कार्यालय विभागासह उद्यान व क्रीडा स्थापत्य, शहरी दळणवळण या विभागांचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे. तसेच सह शहर अभियंता सुनील भागवानी यांच्याकडे त्यांच्याकडील सध्याच्या विभागासह बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे.

## महानगरपालिकेची स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

**पिंपरी । प्रतिनिधी**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रमाच्या प्रत्यक्ष खर्च व सदर खर्च थेट पद्धतीने करण्यास तसेच महापालिकेच्या मुख्य लेखा परीक्षण विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांची रजा मंजुरी तसेच महापालिकेच्या महापालिका स्थायी समिती बैठकीने आज मान्यता दिली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आज स्थायी समितीची सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या बैठकीस आयुक्त श्रावण हर्डीकर,नगरसचिव मुकेश कोळप , अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्यासह समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

मराठी भाषा संवर्धनासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदा देखील मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नुकताच पद्मश्री मिळालेले ज्येष्ठ तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांचा शहराच्या वतीने यांना जीवन गौरव पुरस्कार, पत्रकारांसाठी विशेष व्याख्यान तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये सहभागी कलाकार, वक्ते, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच स्मृतीचिन्ह ,फ्लेक्स, विद्यार्थी, पत्रकार यांच्या करिता चहापान व भोजन व्यवस्था , पुस्तक खरेदी तसेच विविध माध्यमांद्वारे प्रसिद्धी करण्याकरिता येणाऱ्या खर्चास मान्यता स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच महापालिकेच्या मुख्य लेखा परीक्षण विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांची विनंती अर्जानुसार रजा मंजुरीच्या खर्चास देखील आजच्या स्थायी समिती बैठकीत मान्यता देण्यात आली.

## जगात युद्धाचे ढग, भारतात मात्र शांतता; करोडो श्रमिकाच्या वतीने कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मानले आभार!

**पिंपरी । प्रतिनिधी**

जागतिक पातळीवर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे सामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणावर जीवित व मालमत्तेची हानी होत असल्याने जागतिक शांततेसाठी राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या वतीने संत तुकाराम नगर येथे ८ मार्च रोजी रॅली काढण्यात येणार असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी दिली आहे.

प्रसिद्धी पत्रकात कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी म्हटले आहे की, आखाती युद्धामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या संघर्षामुळे संपूर्ण जगात अस्थिरता आणि भीतीचे सावट पसरले असून याचे दूरगामी परिणाम आर्थिक आणि सामाजिक स्तरावर जाणवू लागले आहेत.इराणला सुमारे २४ ते ३५ बिलियन डॉलरपर्यंत म्हणजे २ लक्ष रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे, तर इस्रायलचेही २० हजार कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.अमेरिकेलाही अब्जावधींचा फटका बसला असून हजारो निष्पाप नागरिकांनी प्राण गमावले आहेत.लाखो नागरिकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणामुळे भारतातील नागरिक सुखा समाधानाने नांदत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानावे तेवढे कमी आहेत.



आखाती देशांमधून जगभर पेट्रोलियम कच्च्या मालाचा पुरवठा होत असल्याने हा संघर्ष अधिक काळ चालल्यास जागतिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होतील.इंधन दरवाढ, महागाई आणि बेरोजगारी याचा सर्वाधिक फटका समाजातील सर्व घटकांना व कष्टकरी वर्गाला बसणार आहे.२१व्या शतकात जग प्रगतीपथावर असताना युद्धामुळे पुढील २५ वर्षांची प्रगती मागे जाईल. त्यामुळे भारतासह सर्व प्रमुख राष्ट्रांनी पुढाकार घेऊन तातडीने शांतता प्रस्थापित करावी असे आवाहन कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी केले.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या वतीने रविवार, दि. ०८ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संत तुकारामनगर येथे जागतिक शांततेसाठी रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीत युद्धात प्राण गमावलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे.

## बार्टीमुळेच यूपीएससी उत्तीर्ण होऊ शकलो - राहुल कांबळे

**पिंपरी । प्रतिनिधी**



डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेने मला दिलेल्या शिष्यवृत्तीमुळेच माझ्यासारखा सामान्य कुटुंबातील मुलगा यूपीएससी स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होऊन भारत सरकारच्या सहाय्यक संचालक सुक्षम लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयात अधिकारी म्हणून रुजू झाला. अशा भावना बार्टीची शिष्यवृत्ती घेतलेल्या एका विद्यार्थ्याने व्यक्त केल्या.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेतील संशोधक विद्यार्थी राहुल कांबळे यांनी दिनांक ४ मार्च २०२६ रोजी बार्टी संस्थेला भेट दिली. यावेळी त्यांचा विभागप्रमुख रविंद्र कदम, डॉ बबन जोगदंड, शुभांगी पाटील, लेखाधिकारी नितिन चव्हाण यांच्या हस्ते भारताचे संविधान, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ जोगदंड म्हणाले की, बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा परीक्षेत बार्टीचे विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना दर्जेदार व नाविन्यपूर्ण प्रशिक्षण देण्यात येत आहे. बार्टीचे युपीएससी उर्तीण विद्यार्थी राहुल कांबळे यांनी पीएचडी करत असताना स्पर्धा परीक्षेचाही अभ्यास केला.त्यांत त्यांनी यश मिळवले.बार्टीच्या अनेक विद्यार्थ्यांनी राज्य व नागरी सेवेत अधिकारी म्हणून बार्टीचा नावलौकिक मिळविला आहे. विद्यार्थ्यांनी अधिकारी झाल्याच्यानंतर बार्टीकडे आणि आपल्या विद्यार्थ्याकडे लक्ष देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे,असे आवाहन करुन बार्टी संस्थेच्या वतीने त्यांनी अभिनंदन केले.

सहाय्यक लेखाधिकारी उल्हास शिंदे, प्रकल्प व्यवस्थापक डॉ सारिका थोरात, डॉ अंकुश गायकवाड, विकास गायकवाड, धिरज खाडे, अमिर मुलानी, यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचलन विकास गायकवाड यांनी केले. आभार रामदास लोखंडे यांनी मानले.

# उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

**पिंपरी । प्रतिनिधी**

दिव्यांग बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी उभारण्यात आलेल्या दिव्यांग भवन तसेच उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या विविध साहित्य-साधनांचा दिव्यांग विद्यार्थ्यांनी शिक्षण, कौशल्यविकास आणि व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी प्रभावीपणे उपयोग करून घ्यावा,असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभाग - समावेशित शिक्षण आणि रांजणगाव येथील फियाट इंडिया ऑटोमोबाईल प्रा.लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी येथील कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत सीएसआर सक्षम उपक्रमांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम अवयव व साहित्य वाटप उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमास शिक्षण विभागाच्या शिक्षण सभापती रविना आंगोळकर,नगरसदस्य संदीप वाघेरे,डब्बु असवानी, निकिता कदम,प्रियंका कुदळे,माजी महापौर शकुतलाताई घराडे यांच्यासह महापालिका उपायुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर तसेच




१३१ दिव्यांग विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

साहित्य वाटप शिबिरात १३१ विद्यार्थ्यांना १३ प्रकारची व एकूण १६६ साहित्य-साधनांचे वाटप करण्यात आले. यामध्ये व्हीलचेअर,ब्रेल किट,श्रवणयंत्र,टीएलएम किट,रोलेटर,सीपी चेअर,वॉकर,प्रोग्रामेबल स्मार्टफोन,स्मार्ट केन,कॅलिपर या साहित्य-साधनांचा समावेश होता.२ व ३ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या साहित्य वाटप मोजमाप शिबिरात एकूण २५६ दिव्यांग विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली होती.त्यापैकी १३१ विद्यार्थ्यांना साहित्य-साधनांची शिफारस करण्यात आली होती.

यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य तसेच अंध विद्यार्थ्यांनी गीत सादर केले. यासोबतच समावेशित शिक्षण समन्वयक राजेंद्र पोळके, तसेच विशेष शिक्षक दत्तात्रय खुटवड, कविता ढोरे, संदीप भुजबळ,सचिन अवचिते, रेणुका बिडवई, मंगल गायकवाड,शैला भुजबळ, सोनम साळुंखे, सुजाता गायकवाड,रत्नमाला लोखंडे, जयश्री वाढे, रुपाली देशमुख,माधुरी देशमुख,शोभा कुलकर्णी, कुसुम पाडळे,शुभांगी गोरडे यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशासन अधिकारी (शिक्षण विभाग) संगीता बांगर यांनी तर सूत्रसंचालन गणेश लिंगडे यांनी केले.

दिव्यांग विद्यार्थी हे समाजाचा अविभाज्य घटक आहेत. त्यांच्याकडे केवळ सहानुभूतीने न पाहता त्यांना सक्षम नागरिक म्हणून घडविण्याची जबाबदारी पालक, शिक्षक आणि समाजाची आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांमध्येही प्रचंड क्षमता असून योग्य मार्गदर्शन, शिक्षण आणि साधनांची उपलब्धता मिळाल्यास ते स्वतःच्या पायावर उभे राहू शकतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. असे रविना आंगोळकर, सभापती,शिक्षण समिती, पिंपरी चिंचवड महापालिका यांनी म्हटले.

## संपादकीय...

# ई-चलन वाद

राज्यातील ई-चलन प्रणाली आणि त्यातून होत असल्याचा आरोप असलेल्या कथित डिजिटल दरोड्याच्या मुद्द्यावरून वाहतूकदार संघटनांनी उभा केलेला संघर्ष हा केवळ एका तांत्रिक प्रणालीविरोधातील आंदोलन नाही, तर तो शासनाच्या धोरणांबद्दल वाढत चाललेल्या असंतोषाचेही प्रतिबिंब आहे. महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटीने पुकारलेला बेमुदत संप हा राज्यातील वाहतूक व्यवस्थेवर थेट परिणाम करणारा ठरला आहे. मुंबई, पुणे, ठाणे यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये वाहतूक विस्कळीत होणे ही केवळ सुरुवात मानावी लागेल. ई-चलन प्रणालीचा उद्देश मूळतः वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे आणि मानवी हस्तक्षेप कमी करून पारदर्शकता वाढावी हा होता. मात्र प्रत्यक्षात ही प्रणाली वाहनचालक आणि वाहतूकदारांसाठी त्रासदायक ठरत असल्याची भावना वाढत आहे. एकाच चुकीसाठी अनेक वेळा दंड आकारला जात असल्याची तक्रार, पार्किंगची सुविधा नसतानाही दंड आकारला जाणे, तसेच यंत्रणेमधील तांत्रिक त्रुटी या मुद्द्यांमुळे चालक आणि वाहतूकदारांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. शासनाने डिजिटल प्रणाली आणताना तिच्या अंमलबजावणीतील अडचणींचा पुरेसा विचार केला नसल्याची टीका यामुळे पुढे येत आहे. या संपामुळे केवळ वाहतूकदार किंवा सरकार यांच्यातील संघर्ष मर्यादित राहत नाही, तर त्याचे परिणाम थेट सामान्य नागरिकांवर होताना दिसत आहेत. शाळा बस संघटनांचा सहभाग असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः बोर्ड परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. तसेच दूध, भाजीपाला आणि इंधन यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावरही या संपाचा परिणाम होऊ शकतो. परिणामी, आंदोलनाचे दुष्परिणाम समाजाच्या प्रत्येक घटकाला भोगावे लागू शकतात. शासन आणि आंदोलनकर्ते यांच्यात झालेली बैठक निष्फळ ठरणे ही चिंतेची बाब आहे. केवळ तोंडी आश्वासनांवर आंदोलनकर्ते समाधानी होणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. धोरणात्मक निर्णय घेताना शासनाने संबंधित घटकांशी संवाद साधणे आणि त्यांच्या अडचणी समजून घेणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा अशा प्रकारचे संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने पुढाकार घेऊन वाहतूकदारांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. ई-चलन प्रणालीतील त्रुटी दूर करणे, दंड आकारणीच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि योग्य सुविधा उपलब्ध करून देणे या बाबींवर ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. त्याचवेळी आंदोलनकर्त्यांनीही जनतेला वेठीस धरण्याऐवजी संवादाच्या माध्यमातून तोडगा काढण्याचा मार्ग स्वीकारणे तितकेच महत्त्वाचे आहे.

# नात्यांतील वचनांचे भावनिक सत्य...




काही शब्द असे असतात, जे उच्चारायला एका क्षणाचा वेळ लागतो; पण त्यांचा परिणाम आयुष्यभर सोबत राहतो.... वचन हा तसाच शब्द. तो फक्त ओठांवरून निघालेला आवाज नसतो, तर तो असतो भावनांचा करार, अपेक्षांचा धागा आणि कधी कधी नियतीची दिशा ठरवणारा निर्णय. वचन देताना आपण त्या क्षणाच्या भावनेत असतो; पण त्याचे परिणाम मात्र अनेकदा आपल्या पलीकडे जाऊन इतरांच्या आयुष्यावर उमटतात. माणूस जेव्हा प्रेमात असतो, तेव्हा वचनं सहज दिली जातात....

मी कायम तुझ्यासोबत आहे, तुझ्या आयुष्यात कधी वादळ आणणार नाही, तुझ्याशिवाय जगू शकत नाही हे शब्द ऐकायला गोड, पण त्यात एक न बोललेलं ओझं असतं. कारण आयुष्य हे स्थिर नसतं....

परिस्थिती बदलते, माणसं बदलतात, नात्यांचे अर्थ बदलतात. पण दिलेलं वचन मात्र बदलत नाही. ते तसंच उभं राहतं - प्रश्न विचारत. इतिहास आणि पुराणकथांमध्येही वचनांची किंमत मोठी आहे. भीष्म यांनी दिलेल्या एका कठोर वचनामुळे पुढे उभं राहिलं महायुद्ध - महाभारत. त्या एका शब्दाने त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचा त्याग झाला आणि संपूर्ण वंशाच्या भवितव्यावर परिणाम झाला. तसेच दशरथ यांनी दिलेल्या वचनामुळे घडलं रामायण - रामांचा वनवास, पित्याचा विरह, आणि एका कुटुंबाची तुटलेली शांतता. वचन देणारा एक असतो, पण परिणाम अनेकांना भोगावे लागतात - हीच त्याची शोकांतिका.

नात्यांमध्येही हेच दिसून येतं....

कधी आपण रागाच्या भरात वचन देतो - आता कायमच दूर राहीन. कधी प्रेमाच्या भरात - तुझ्याशिवाय जगणार नाही. पण ही वचनं अनेकदा भावनेचा अतिरेक असतात, वास्तवाचा विचार नसतो. नातं टिकवण्यासाठी वचनांची गरज नसते; त्याला गरज असते विश्वासाची, संवादाची आणि एकमेकांच्या स्वातंत्र्याचा आदर करण्याची....

वचन म्हणजे बांधिलकी, पण ती जबरदस्तीची नसावी. जर एखादं नातं केवळ दिलेल्या शब्दावर टिकून असेल, तर ते भीतीवर उभं असतं, प्रेमावर नाही. प्रेम हे मोकळं असावं...

त्यात कायम, नेहमी, कधीच नाही असे कठोर शब्द नसावेत; त्यात असावी समजूत, संयम आणि परिस्थितीनुसार बदलण्याची तयारी.

शेवटी, वचन देणं चुकीचं नाही...

पण वचन देताना आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा - हे वचन मी निभावू शकेन का? आणि ते निभावताना कुणाचं आयुष्य उद्ध्वस्त होणार नाही ना? कारण शब्द तुटले की आवाज होतो; पण वचन तुटलं की मन तुटतं.

म्हणून नात्यांना वचनांची नव्हे, तर जिव्हाळ्याची गरज असते...


शब्दांनी बांधलेली नाती कमकुवत असतात; पण विश्वासाने जोडलेली नाती काळालाही हरवतात. वचन देण्यापेक्षा साथ देणं मोठं असतं. कारण शेवटी, आयुष्य शब्दांवर नाही - तर कृतीवर आणि प्रेमावर उभं असतं...

# गुंडाला कानशिलात लगावणाऱ्या पैलवानावर गोळीबार

**जामखेड । प्रतिनिधी**

पुण्यातील कुख्यात गुंड निलेश घायवळ याच्या टोळीची जिल्हाभर दहशत असताना, त्याला भर कुस्तीच्या मैदानात कानशिलात लगावणारा पैलवान व गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला सागर मोहोळकर याच्यावर अज्ञातांकडून गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात सागर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उपचारांसाठी सागर मोहोळकरला पुण्यातील रूग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अज्ञात हल्लेखोरांनी सागरवर जवळून गोळीबार केला. त्याच्या डोक्याच्या दिशेने गोळी झाडण्यात आली होती; मात्र तो थोडक्यात बचावल्याचे सांगितले जात आहे. गोळी लागून तो जखमी झाल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि जखमी सागरला रुग्णालयात दाखल केले.

गोळीबारानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. पोलिसांनी परिसराची नाकाबंदी करून शोधमोहीम सुरू केली आहे. घटनास्थळावरून पुरावे गोळा करण्यात आले असून सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. या हल्ल्यामागे वैयक्तिक वैर, गँगवॉर की इतर कोणते कारण आहे, याचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. संशयितांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. या घटनेमुळे जामखेड तालुक्यात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सागर मोहोळकर हा पैलवान म्हणून ओळखला जात असला, तरी त्याच्यावर गंभीर गुन्हे दाखल असल्याची नोंद आहे. काही



वर्षांपूर्वी एका खून प्रकरणात त्याला अटक करण्यात आली होती आणि तो कारागृहातही होता. तुरुंगवास भोगल्यानंतर तो जामिनावर बाहेर आला. कारागृहात असतानाही त्याच्याविरोधात आणखी एका गंभीर गुन्ह्याची नोंद झाल्याची चर्चा आहे.

दरम्यान, एप्रिल २०२५ मध्ये धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील आंदरूड येथे जत्रेदरम्यान आयोजित कुस्ती स्पर्धेत सागरने भर मैदानात निलेश घायवळच्या कानाखाली लगावल्याची घटना मोठ्या प्रमाणावर चर्चेत आली होती. गावात दोन वेगवेगळे कुस्ती फड सुरू होते. त्यावेळी सागरने कुस्ती लावण्याची मागणी पंचांकडे केली होती; मात्र आधीच नियोजित कुस्त्यांमुळे त्याची मागणी फेटाळण्यात आली. त्या वेळी मैदानात उपस्थित असलेल्या निलेश घायवळशी वाद निर्माण झाला आणि सागरने आखाड्यात घुसून त्याला कानशिलात मारली होती. या पार्श्वभूमीवर झालेला ताजा गोळीबार हा पूर्वीच्या वादाशी संबंधित आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

शहरात तणावाचे

जेव्हा निलेश घायवळला कानाखाली लगावली होती तेव्हा त्या घटनेचा वाशी पोलिसांनी गुन्हा दाखल करत सागर मोहोळकरला ताब्यात घेतलं होतं. वाशी पोलीसांकडून त्यांची कसून चौकशी केली होती. पोलीस तपासात सागर मोहोळकरचा भयंकर इतिहास समोर आला आहे. तो कुस्तीच्या फडासह गुन्हेगारी क्षेत्राचा पक्का खिलाडी असल्याचं पोलीस तपासातून समोर आलं आहे. कारण त्याच्यावर याआधी खुनाचे दोन गुन्हे दाखल असल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. काही वर्षांपूर्वी सागर मोहोळकरला एका खुनाच्या गुन्ह्यात अटक करण्यात केलेली होती. त्याला तुरुंगवास देखील झाला होता. खुनाच्या गुन्ह्यात तुरुंगात असताना सागरने तुरुंगात आणखी एकाचा खून केल्याची माहिती समोर आली आहे.

# गोडाऊनवर पोलिसांची धाड; चोरीच्या दुचाकी मॉडीफाय करून विक्रीचा प्रकार उघड

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. बीडच्या पोलीस अधीक्षकांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत १७ दुचाकींसह २५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलं आहे. याप्रकरणी ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. जिल्ह्यातील दुचाकी चोरीच्या सर्वात मोठ्या कारवाईपैकी ही एक कारवाई असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली आहे.

बीड जिल्ह्यातील दुचाकी चोरीच्या रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. गेवराई परिसरातून चोरीला गेलेल्या दुचाकींचा तपास करताना पोलिसांनी नेकनूर परिसरातील एका गोडाऊनवर धाड टाकली. या ठिकाणी चोरीच्या दुचाकींचे स्पेअर पार्ट बदलून मॉडीफाय करून बाजारात विक्री केल्या जात होत्या. या कारवाईत दोन आयशर टेम्पो भरून १७ दुचाकी आणि साहित्य असा २५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली. जिल्ह्यातील दुचाकी चोरीच्या सर्वात मोठ्या कारवाईपैकी ही एक कारवाई असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली.



### गोवऱ्या विक्रीसाठी आलेल्या चार महिलांना मुलं चोरणारी टोळी समजून नागरिकांनी पकडले

होळी धुलीवंदन सणांसाठी लागणाऱ्या गोवऱ्या विक्रीसाठी आलेल्या चार महिलांना मुलं चोरणारी टोळी समजून नागरिकांनी पकडल्याची घटना नाशिक शहरातील लेखा नगर येथे घडली होती. सदर घटनेची माहिती अंबड पोलिसांना मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन या महिलांची विचारपूस केली. यावेळी त्यांनी आमच्या उदरनिर्वाहासाठी दरवर्षी होळी सणा निमित्ताने गोवऱ्या - लाकडं विक्री करत असतो. आमच्याजवळ जी मुले आहेत ती देखील आमचीच असल्याचं सांगितलं. यानंतर पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांनी सांगितलेल्या नाशिक रोड ठिकाणी घेऊन गेल्यानंतर विचारपूस केली असता येथील दुकानदार भाजी विक्रेते यांनी देखील या महिला व्यावसायिकच असल्याचा सांगितलं. सदर महिला या आपल्या व्यवसायासाठी या ठिकाणी आल्या होत्या. त्यामुळे अफवांवर कोणीही विश्वास ठेवू नये असंही यावेळी पोलिसांकडून सांगण्यात आल आहे. याबाबत अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगवेंद्रसिंग राजपूत प्रकरणाची सखोल माहिती घेऊन प्रतिक्रिया दिली.

# अनैतिक संबंधांच्या संशयातून तरुणाची निर्घृण हत्या

**नांदेड । प्रतिनिधी**



नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात धक्कादायक खूनप्रकरण उघडकीस आले आहे. नातलगातील विवाहित महिलेसोबत संबंध ठेवल्याच्या रागातून २२ वर्षीय तरुणाला अमानुष मारहाण करून ठार मारण्यात आल्याची घटना ३ मार्च रोजी पहाटे मौजे थडीसावळी येथे घडली. मयत तरुणाचे नाव दुर्गेशसिंह ठाकूर (रा. मुतण्याळ, ता. बिलोली) असे आहे. तो व्यवसायाने इलेक्ट्रीशियन होता.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुर्गेशसिंह याचे थडीसावळी येथील नातलगातील एका विवाहित महिलेसोबत संबंध असल्याचा संशय होता. ही बाब महिलेच्या कुटुंबियांना समजताच संतापलेल्या नातेवाईकांनी ३ मार्च रोजी पहाटे पाचच्या सुमारास दुर्गेशसिंहच्या घरी जाऊन त्याला जबरदस्तीने उचलून थडीसावळी येथे आणले.

तेथे आमच्या मुलीशी संबंध का ठेवतोस? असा जाब विचारत आरोपींनी दुर्गेशसिंह आणि संबंधित महिलेला केबलच्या वायरने मारहाण केली. दुर्गेशसिंहच्या गुप्तांगावर लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याने त्याची प्रकृती गंभीर झाली. त्यानंतर त्याला उलट्या होऊन तो जागीच कोसळला आणि त्याचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणी रामतीर्थ पोलीस स्टेशन येथे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेचा पती पद्मसिंह गंगासिंह ठाकूर याच्यासह एकूण सात जणांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये राजूसिंह गंगासिंह ठाकूर, गंगासिंह हनुमानसिंह ठाकूर (रा. थडीसावळी), तसेच दिलीपसिंह ठाकूर, विजयसिंह ठाकूर, विशालसिंह ठाकूर आणि प्रतापसिंह ठाकूर (रा. निर्मल, तेलंगणा) यांचा समावेश आहे. न्यायालयाने सर्व आरोपींना शनिवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, घटनेनंतर थडीसावळी गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. या निर्घृण हत्येमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, कठोर कारवाईची मागणी होत आहे.

# म्हसवड धिंड प्रकरण पुन्हा चर्चेत; अल्पवयीन मुलाची धिंड काढल्याचा आरोप, पोलिसांवर कारवाईची मागणी

**सातारा । प्रतिनिधी**

साताऱ्यातील म्हसवड धिंड प्रकरण आता पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. अल्पवयीन मुलांची कथित धिंड काढल्याच्या प्रकरणात संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, या मागणीसाठी तक्रारदार आणि त्यांच्या नातेवाईकांनी आज जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. यावेळी समाजकार्यकर्ते आणि कुटुंबीयांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत, अल्पवयीन मुलांचा सन्मान धुळीस मिळवणाऱ्यांवर तात्काळ कारवाई झालीच पाहिजे, अशी भूमिका मांडली.

कारवाई न झाल्यास उद्यापासून लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.दरम्यान, जिल्हा पोलीस अधीक्षकांनी संबंधित प्रकरणाचा सविस्तर अहवाल उद्यापर्यंत मागवून घेतो, असं आश्वासन दिलं आहे. आता प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेतं, आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होते का, याकडे सातारा जिल्ह्याचं लक्ष लागलं आहे.

सातारा जिल्ह्यातील म्हसवड येथे पोलिसांच्या कारवाईवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. अवघ्या १६ वर्षांच्या अल्पवयीन मुलावर इंस्टाग्रामवर



हत्यारासह फोटो पोस्ट केल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करून त्याची भर बाजारातून त्याची धिंड काढण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करत कुटुंबीयांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दिली आहे..नेमकं काय आहे संपूर्ण प्रकरण पाहूया या रिपोर्टमधून.

म्हसवड येथे नोव्हेंबर २०२५ मध्ये पोलिसांनी सहा मुलांना ताब्यात घेत गरुडा गँग उघड केल्याचा दावा केला होता.

मात्र तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, या मुलांचा एकमेकांशी कोणताही संबंध नसून त्यांच्यावर कोणताही गुन्हेगारी इतिहास नाही. ताब्यात घेतलेल्या मुलांपैकी एक मुलगा अल्पवयीन असून त्याच्यावर दीड वर्षांपूर्वी सोशल मीडियावर कोयत्यासोबत फोटो ठेवला होता, या कारणावरून गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. यानंतर या मुलांना म्हसवड बाजारातून फिरवत त्यांची धिंड काढण्यात आल्याचा आणि त्याचे फोटो-व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याचा आरोप करण्यात आला आहे

मुलगा अल्पवयीन असतानाही त्याची धिंड काढली, त्याचे नावही जाहीर केले. आमच्या मुलाचे करिअर खराब झाले. संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी अल्पवयीन मुलाच्या आईवडीलांनी केली आहे. या प्रकरणी न्याय न मिळाल्यास म्हसवडमध्ये आंदोलन करण्याचा इशारा कुटुंबीयांनी दिला आहे. दरम्यान, या घटनेची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलीस प्रशासनाने दिली आहे. म्हसवडमधील या प्रकरणामुळे पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून चौकशी अहवालानंतर पुढे काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आमच्या मुलाचं नाव सगळीकडे दिलं, त्याची बदनामी केली, त्याचं नाव घालवलं, त्याने कोणाचा खून केला होता का? त्याच्या आयुष्याची बदनामी केली आहे, आयुष्यभरासाठी त्याचं नाव खराब केलं आहे. खेळात त्याची २ वेळा जिल्हा पातळीवर निवड झालेली, तालुका पातळीवर निवड झालेली, केवळ त्याने दिड वर्षांपूर्वी स्टेटस ठेवला म्हणून पोलिसांनी त्याला अडकवलं आहे. कोयत्या गँग आणि कोणती गँग आयुष्यात त्याचा कधी संबंध आला नाही, अशा लोकांशी संबंध जोडून त्याची धिंड काढली आहे, अशी माहिती अल्पवयीन मुलाच्या आईने वडिलांनी माहिती दिली आहे.

## थोडक्यात

### जाहिरातीतून एसटी कमविणार २५० कोटी रुपये - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धावणारी 'लालपरी' आता केवळ प्रवाशांची नव्हे, तर महसूलवाढीलाही वेग देणार आहे. पुढील पाच वर्षांत केवळ जाहिरातींच्या माध्यमातून एसटी महामंडळाला तब्बल २५० कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल मिळणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

एसटी महामंडळाच्या मुख्यालयात पार पडलेल्या ३१० व्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहा.कामगार आयुक्त पल्लवी सहारे, तसेच सर्व खातेप्रमुख उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाची २५१ आगारे आणि ६१० पेक्षा अधिक लहान-मोठी बसस्थानके राज्यभर आहेत. सुमारे १२ हजार बसेसच्या ताफ्याद्वारे दररोज ५० ते ५५ लाख प्रवाशांची ने-आण केली जाते. भविष्यात बससंख्या वाढल्यानंतर ही दैनंदिन प्रवासी संख्या १ कोटींपर्यंत जाईल. अशा व्यापक पोहोच असलेल्या माध्यमावर जाहिरात देणे म्हणजे उत्पादकांसाठी सुवर्णसंधीच आहे. चांद्यापासून बांद्यापर्यंत, गावखेड्यांपासून महानगरांपर्यंत पोहोचणाऱ्या एसटीच्या प्रत्येक चाकासोबत आता महसुलाची नवी चक्रेही फिरणार आहेत. बसस्थानके, त्यांचा परिसर, बसेसच्या आतील व बाहेरील भाग तसेच उपलब्ध सर्व संसाधनांचा पुरेपुर वापर करून जाहिरात महसूल वाढविण्याचा महत्त्वाकांक्षी आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, पुढील पाच वर्षांसाठी २५० कोटी रुपयांहून अधिक महसूल देणारी निविदा स्वीकारण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सद्यस्थितीत कार्यरत असलेले जाहिरात परवानाधारकांचा परवाना कालावधी समाप्त झाल्यानंतर जाहिरातीचे अधिकार नवीन परवानाधारकांकडे जाणार आहेत.

सध्या जाहिरातींद्वारे दरवर्षी सुमारे २२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. नव्या निविदेमुळे या उत्पन्नात तब्बल दुपटीपेक्षा जास्त वाढ होणार आहे. अशाप्रकारे तिकीट विक्रीव्यतिरिक्त विविध पर्यायी स्रोतांमधून उत्पन्न निर्माण झाले, तर एसटीला भविष्यात तोट्याच्या गर्तेत जाण्याची वेळ येणार नाही, असा विश्वासही मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

### बहिरी गल्लीत शिमगोत्सवाचा रंगबिरंगी जल्लोष!

**रेवदंडा । प्रतिनिधी**

रेवदंडा गावातील कोकण मातीतला उत्साह, परंपरा आणि संस्कृतीचा अभिमान पुन्हा एकदा जोर धरला. सुमारे ३५० वर्षे जुनी ही होळी परंपरा काही वर्षांपूर्वी विकृत बुद्धीच्या काही लोकांच्या बंदी प्रयत्नांना देवांनी चांगलीच अद्दल घडवली. आता मात्र रेवदंडा बहिरी गल्लीतील शिमगोत्सव ढोल-ताश्याच्या गजबजाती जल्लोशात साजरा होतोय. फाल्गुन पौर्णिमेला होळी जाळून हा सोहळा सुरू झाला. गावकऱ्यांनी सुकी लाकडे, गोळ्या गोळा करून चौकात केळी-सुपारी उभी करत होळी पेटवली. पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करून सर्वजण पूजा करत होळी रे होळी पुरणाची पोळी असं गात नाचले. जुन्या कटुता जाळून नवचैतन्याचा संदेश देणारा हा उत्सव कोकणातील लोकपरंपरेचं जिवंत प्रतीक ठरला. सर्वत्र होळीचा वाजत गाजत गावकऱ्यांसह तरुण, महिलांबरोबर ज्येष्ठांचा सहभाग असलेली उत्सव गावभर होत असतो . रेवदंडा बहिरी गल्ली होळीचा नवस पावणाऱ्यांनीही अनुभव सांगितले. होळीला गवऱ्या पाच-पाच, डोक्यावर नाच-नाच असं गाणं गात गोळा केलेल्या लाकडांनी उत्सवाची रंगत वाढवली. धुळिवडेला रंग-गुलाळ उधळून बंधुभावाचा हा सोहळा अधिकच रंगला.

रेवदंड्याची सांस्कृतिक ओळख जपणं ही आपली सर्वांची जबाबदारी, असं जितेंद्र पाटील, गणेश घरत, विनोद नाईक, संदीप पाटील, सचिन पवार, बाबू पाटील, हुपेंद्र पाटील, प्रल्हाद घरत, अनुज पाटील, सई पाटील, राजू राणे यांनी सांगितलं. कोकण शिमगोत्सव केवळ सण नसून पूर्वजांची श्रद्धा-एकात्मतेचा महोत्सव असल्याचं ते म्हणाले.

# पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम' या चित्रपटाचा विशेष प्रीमियर

## दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत महोत्सवाचा होणार समारोप

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सहकार्याने आणि पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी व गाथा फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय महोत्सव २०२६' मध्ये ५ मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजता 'क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम' या चित्रपटाचा विशेष प्रीमियर होणार आहे. त्यानंतर या महोत्सवाचा दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे हा कार्यक्रम होणार असून जास्तीतजास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६ ची सुरुवात ३ मार्च रोजी झाली असून या महोत्सवाचे पारितोषिक वितरण गुरूवार, ५ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तसेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे,




नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमूख उपस्थिती तसेच खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ.अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, शंकर जगताप, शंकर मांडेकर, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग सदस्य ड.गोरक्ष लोखंडे, महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, शहर सुधारणा समिती सभापती संजय नाना काटे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, आयुक्त श्रावण हर्डीकर, शहरातील नगरसदस्य, नगरसदस्या तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, उप आयुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटीचे दत्ता गुंड, अभिषेक अवचार, डॉ. विश्वास शेंबेकर, प्रा. डॉ. पांडुरंग भोसले, जय भोसले, गाथा फिल्म सोसायटी अध्यक्ष पुजा गुंड, श्रुती शेंबेकर यांची देखील उपस्थिती लाभणार आहे.

आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमापूर्वी दुपारी ३ वाजता 'क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम' या चितपटाचा प्रीमियर ठेवण्यात आला आहे. यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर देखील उपस्थित राहणार आहे. नागरिकांनी देखील या चित्रपटाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे

**दिग्दर्शक रोहन कानवडे यांना दिला जाणार सिने आयकॉन पुरस्कार**

पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६ च्या पारितोषिक वितरण समारंभात 'साबर बोंडं' या आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या चित्रपटाचे दिग्दर्शक रोहन कानवडे यांना 'पीसीआयएफएफ युवा प्रेरणादायी सिने आयकॉन पुरस्कार २०२६' मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. याशिवाय या सोहळ्यात बेस्ट फिचर फिल्म, सर्वोत्कृष्ट माहितीपट, सर्वोत्कृष्ट लघुपट, सर्वोत्कृष्ट चित्रपट, ६० सेकंदाचा सर्वोत्कृष्ट लघुपट असे विविध पुरस्कार दिले जाणार आहेत.

## चोरीच्या संशयावरून पोलीस चौकशी; १७ वर्षीय मुलीची विष प्राशन करून आत्महत्या

**भंडारा । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या लाखांदूरमधील चिंचोली गावातून धक्कादायक घटना समोर आली आहे. एका १७ वर्षीय तरुणीवर चोरीचा आरोप केल्यानंतर पोलिसांनी तिची चौकशी केली. या चौकशीदरम्यान पोलिसांनी मारहाण केल्याचा आरोपही तरुणीकडून करण्यात आला. मात्र, या आरोपानंतर संबंधित मुलीने विष प्राशन करुन आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अल्ववयीन मुलीच्या पालकांनी पोलिसांच्या तपासामुळेच मुलीने जीवन संपवल्याचा गंभीर आरोप केला आहे. याप्रकरणी, तक्रार दाखल करण्यात आली असून अधिक तपास सुरू असल्याची माहिती भंडाऱ्याच्या जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिली.

ज्या अल्पवयीन मुलीवर चोरीचा आरोप लावण्यात आला, त्या अल्पवयीन मुलींनं पोलीस चौकशी दरम्यानच घरी विषप्राशन करून आत्महत्या केल्याची खळबळजनक



घटना भंडारा जिल्ह्यातील लाखांदुरात घडली आहे.

लाखांदूरच्या चिचोली गावातील एका किराणा व्यवसायिकाने त्याच्या दुकानातून २५ हजार रुपयांची चोरी झाल्याची तक्रार लाखांदूर पोलिसात केली होती. दुकानदाराने संशय व्यक्त केल्यावरुन पोलिसांनी १७ वर्षीय अल्पवयीन तरुणीला ताब्यात घेऊन २ मार्च रोजी तिची दिवसभर चौकशी केली. मात्र, या चौकशी दरम्यान पोलिसांनी जबरदस्त मारहाण केल्याचा आरोप करीत मुलींनं विषप्राशन करून आत्महत्या केल्याचा आरोप आता तरुणीच्या आई-वडिलांनी पोलिसांवर लावला आहे.

याप्रकरणी भंडारा जिल्हा पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांनी माहिती देताना सांगितले की, २७ फेब्रुवारीला लाखांदुरात दाखल झालेल्या तक्रारीनंतर अल्पवयीन मुलीला चौकशीसाठी ताब्यात घेतलं.

मात्र, मुलीची चौकशी सुरू असतानाच तिने आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी आता पोलिसांनी तक्रार दाखल केली असून अधिक तपास करीत असल्याचंही सांगितलं.

दरम्यान, चोरी झालेली २५ हजार रुपयांची रक्कम मुलीच्या नातेवाईकांकडून ताब्यात घेण्यात आल्याची माहिती नुरुल हसन यांनी दिली.

## मानवतच्या पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची क्षेत्रभेट उत्साहात

**मानवत । प्रतिनिधी**

येथील पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे विद्यार्थी, शिक्षक व काही पालकांच्या सहभागातून शैक्षणिक क्षेत्रभेट वैशिष्ट्यपूर्ण ठरली. या वेळी 'पुस्तकाबाहेरचे शिक्षण' संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला आहे.



क्षेत्रभेटीची सुरुवात येलदरी येथील वन उद्यानास भेट दिली.

उजाड माळरानावर वन विभागाने फुलवलेले एक सुंदर नंदनवन आहे. वन विभागाने येथे विविध प्रकारची झाडे लावली असून, येथे ३६ पेक्षा जास्त प्रकारच्या फुलपाखरांच्या प्रजातींची नोंद झाली आहे. हे ठिकाण निसर्ग पर्यटन, विस्तीर्ण झाडे, फुलपाखरू उद्यान,धरणाचे विहंगम दृश्य आणि शांत वातावरणासाठी लोकप्रिय आहे.

त्यानंतर नेमगिरी संस्थान व औंढा नागनाथ येथील उद्यान, बारा ज्योतिर्लिंगांपैकी ८ वे (आद्य) पवित्र तीर्थक्षेत्र १३ व्या शतकातील हेमाडपंती नागनाथ मंदिर, हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून ते इतिहास, स्थापत्यशास्त्र, श्रद्धा आणि संस्कृती यांचा एक अद्भुत संगम आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली व विद्यार्थ्यांनी ती माहिती वहित नमुद करुन घेतली. नवीन ठिकाणे पाहिल्याने आत्मविश्वास, स्वतंत्र विचार आणि जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली.

क्षेत्र भेट हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून शिक्षणाला प्रत्यक्ष अनुभवाशी जोडणारे अत्यंत प्रभावी माध्यम ठरले आहे. सहली मध्ये शिक्षकवृंद यांचे योग्य नियोजन जानवले.

## पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांवर लवकरच पदभरती; -पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

पशुसंवर्धन विभागातील नवीन आकृतीबंध ऑक्टोबर २०२४ मध्ये मंजूर झाल्यामुळे काही संवर्गातील पदसंख्या वाढली आहे. पदभरतीची प्रक्रिया गतीने सुरू असून पुढील अधिवेशनापर्यंत मोठ्या प्रमाणात भरती प्रश्न मार्गी लागेल, असा विश्वास पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेत व्यक्त केला.

विधान परिषद सदस्य संजय खोडके यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना मंत्री मुंडे म्हणाल्या की, वाढीव पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) सोबत सातत्याने पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यानुसार २५ एप्रिल २०२५ रोजी एलडीओ (पशुवैद्यकीय विकास अधिकारी) पदांची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. तसेच १२ ऑगस्ट रोजी वर्ग-एक दर्जाच्या सहा सहाय्यक आयुक्त पदांची जाहिरातही काढण्यात आली आहे.

परीक्षेसाठी पेपर सेटिंग प्रक्रियेसाठी तज्ज्ञ अधिकारी व प्राध्यापकांची नियुक्ती आवश्यक असून पेपर सेटिंगचे काम पूर्ण होताच परीक्षा घेण्यात येईल, असेही मंत्री मुंडे यांनी सांगितले. त्याचबरोबर, एमपीएससीकडूनही भरती प्रक्रियेला गती देण्याचे आश्वासन देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. पशुपर्यवेक्षकांची पदे जिल्हा परिषदेमार्फत भरण्यात येणार असून त्याबाबत सामान्य प्रशासन विभागाशी चर्चा झाली आहे.

नवीन आकृतीबंधानुसार वाढलेल्या पदांची भरती अपरिहार्य आहे. त्यानुसार सर्व प्रक्रिया सुरू असून पुढील अधिवेशनापर्यंत मोठ्या प्रमाणात पदभरती पूर्ण होईल, असे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

## रिल्ससाठी जीवघेणे स्टंट; नागपूरात तरुण अटकेत

**नागपूर । प्रतिनिधी**

सध्या रिल्स बनवण्यासाठी किंवा आपल्यातील कला दाखवण्यासाठी अनेकदा काहीजण जीवघेणा स्टंट करतात. मात्र, रस्त्यावर गाडी चालवताना वाहतुकीचे नियम पाळणे गरजेचे असतानाही असे स्टंट केले जातात.

या स्टंटमुळे इतर प्रवाशांना, वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होतो, अनेकदा अपघाताचीही शक्यता असते. नागपूरमधील वाठोडा पोलिस स्टेशन परिसरात गस्त घालत असताना, गुन्हे शाखा युनिट ५ च्या पथकाने एका तरुणाचा पाठलाग करून त्याला अटक केली. तरुण रस्त्यावर धोकादायक स्टंट करत होता आणि बेदरकारपणे मोटारसायकल चालवत होता. त्यामुळे, ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, वाठोडा पोलिस स्टेशन परिसरातील मुख्य रस्त्यावर



हा तरुण वेगाने मोटारसायकल चालवत स्टंट करत होता, ज्यामुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले होते. या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून, पेट्रोलिंग करणाऱ्या पोलिस पथकाने तात्काळ त्याचा पाठलाग करून त्याला अटक केली. अटक केलेल्या तरुणाचे नाव सूरज सिंग विक्रम सिंग (२० वर्षे) असे आहे. तो जरीपटका येथील लाल गोदाम येथील रहिवासी आहे. स्वामीनारायण मंदिर परिसरात नाकाबंदी दरम्यान आरोपीला ताब्यात घेऊन पारडी वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आले, जिथे त्याच्याविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली.

पोलिसांनी नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे आणि रस्त्यावर स्टंट करून किंवा बेपर्वाईने गाडी चालवून स्वतःचा किंवा इतरांचा जीव धोक्यात घालू नये असे आवाहनही केले आहे. तसेच, अशा प्रकरणांमध्ये कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिसांनी दिला.

# वसईत वाहतूक पोलिसावर दगडाने जीवघेणा हल्ला

**वसई । प्रतिनिधी**

एका दुचाकीस्वाराने बंदोबस्तावरी असलेल्या वाहतूक पोलिसाला भर रस्त्यात मारहाण करत डोक्यात दगड घालून हत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. वसईच्या गोखिवरे नाक्यावर काल (मंगळवारी, ता ३) दुपारी ही घटना घडली. या हल्ल्यात वाहतूक पोलीस जसवंत वळवी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चार तरुण एकाच दुचाकीवरून येत असल्याने त्यांना पोलिसाने अडवले होते.

धुळवड निमित्ताने मंगळवारी वाहतूक पोलिसांनी शहरात ठिकठिकाणी तपासणी मोहीम सुरू केली होती. वसई वाहतूक विभागाचे सहाय्यक फौजदार जसवंत वळवी (५२) हे मंगळवारी वसई पूर्वेच्या गोखविरे रेंज नाक्यावर बंदोबस्तासाठी होते. त्यांच्यासोबत अन्य एक पोलीस होता. दुपारी साडेतीनच्या सुमारास एका दुचाकीवरून ४ जण जात असलेले वळवी यांना दिसले. त्यामुळे वळवी यांनी ती दुचाकी थांबवली. दुचाकीस्वार अभिषेक जैस्वार (२१) याने वळवी यांच्याशी हुज्जत घातली. अचानक तो आक्रमक झाला आणि त्याने जवळ पडलेला मोठा दगड उचलून वळवी यांच्या डोक्यात घातला. ते पाहून सोबत असलेले दुसरे पोलीस मदतीला आले. मात्र जैस्वार आक्रमकपणे दगडाने वळवी यांच्या डोक्यावर मारत होता. या हल्ल्यात वळवी रक्तबंबाळ झाले. त्यांच्या डोक्याला तीन ठिकाणी गंभीर दुखापत झाली. वळवी यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



वालीव पोलिसांनी आरोपी अभिषेक जैस्वार याला अटक केली आहे. त्याच्याविरोधात हत्येचा प्रयत्न, सरकारी कामात अडथळा आणणे तसेच मोटार वाहन अधिनियमाच्या कलमाअंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली होती.

या घटनेबाबत प्रत्यक्षदर्शी सचिन मोरे यांनी सांगितलं की, काल एक भायानक आणि विचीत्र घटना घडली. दोन अडीच वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरती चौघंजण बसून येत होते. पोलिसांना पाहून तो त्या तिघांना तिथे मागे उतरून तो एकटाच इकडे गाडी घेऊन आला त्यावेळी पोलिस अधिकारी त्यांची ड्यूटी करत होते, त्यावेळी त्याने हातात दगड घेऊन त्यांच्यावरती प्राणघातक हल्ला केला, डोक्यावरती दगडाने हल्ला केला. वालीव पोलिसांनी आरोपीविरुद्ध हत्येचा प्रयत्न, सरकारी कामात अडथळा आणणे तसेच मोटार वाहन कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांवरील वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## संक्षिप्त

### राज्यातील २७१ डेपो सार्वसनिक-खासगी सहभागातून विकसित होणार - मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील २७१ परिवहन डेपो सार्वजनिक-खासगी सहभाग तत्त्वावर विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अंतर्गत चांगल्या उत्पन्नक्षम डेपोसोबत दोन ग्रामीण किंवा तालुका स्तरावरील डेपो अशा तीन डेपोचे एक पॅकेज तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण भागाचा समतोल विकास साधण्यावर भर देण्यात येणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य विक्रम काळे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सदाभाऊ खोत, भाई जगताप यांनी उपप्रश्न उपस्थित केला. मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, राज्यातील बसस्थानकांवरील स्वच्छतागृहे विनामूल्य व स्वच्छ ठेवण्यासाठी स्वतंत्र कंत्राटदार नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दोन महिन्यांत या योजनेची अंमलबजावणी होणार असून प्रवाशांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. प्रायोगिक तत्त्वावर ठाणे येथील खोपट आणि मुंबई विभागातील मुंबई सेंट्रल येथे चालक-वाहक विश्रांतीगृहांचे अत्याधुनिक पद्धतीने नूतनीकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये वातानुकूलित व्यवस्था, बंक बेड, स्वच्छ पिण्याचे पाणी, गरम पाण्याची सोय आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

महामंडळाला पूर्वी जाहिरात व इतर स्रोतांमधून वर्षाला सुमारे २२ कोटी रुपये उत्पन्न मिळत होते. मात्र नव्या निविदा प्रक्रियेनंतर पुढील पाच वर्षांत सुमारे २५० कोटी रुपये उत्पन्न मिळणे अपेक्षित असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

### मिहान प्रकल्पातून १.२७ लाखांहून अधिक रोजगार निर्मिती - मंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई । प्रतिनिधी**

नागपूर येथील मल्टी मॉडेल इंटरनॅशनल कार्गो हब अँड इम्पोर्ट (मिहान) प्रकल्प हा राज्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. एसईझेड आणि नॉन-एसईझेड क्षेत्रांचा समावेश असलेल्या या प्रकल्पात आतापर्यंत १२० कंपन्यांनी गुंतवणूक केली असून त्यापैकी ९० कंपन्यांचे काम प्रत्यक्ष सुरू आहे. या प्रकल्पामुळे आतापर्यंत १,२७,२२५ रोजगारांची निर्मिती झाली असल्याची माहिती मंत्री ड. आशिष शेलार यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य कृपाल तुमाने यांनी नागपूर जिल्ह्यातील मिहान प्रकल्पासंदर्भात प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री ड. शेलार म्हणाले की, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत राज्य शासनाने कायद्याच्या चौकटीत सकारात्मक भूमिका घेतली असून जमीन, मोबदला, वाढीव भरपाई, घरबांधणी खर्च, प्लॉट आणि घरबांधणीसाठीची आर्थिक मदत यांसारख्या सुविधा दिल्या जात आहेत.

१२.५ टक्के विकसित भूखंडाचा पर्याय स्वीकारलेल्या ३६० प्रकल्पग्रस्तांना ९ एप्रिल २०२५ च्या शासनपत्रानुसार पात्र ठरविण्यात आले आहे. या भूखंडांसाठी विकास शुल्क आकारले जात असून, पूर्वी प्रति चौ.फुट रुपये ६४ असलेले शुल्क कमी करून रुपये ५० प्रति चौ.फुट करण्यात आले असल्याची माहितीही मंत्री ड शेलार यांनी दिली.

काही प्रकल्पग्रस्तांनी शुल्क भरण्यासाठी मुदतवाढ मागितल्याने त्यांना ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मिहानमधील कंपन्यांमध्ये स्थानिकांना संधी मिळावी यासाठी प्रशिक्षण व्यवस्था करण्यात आली आहे. पाच टक्के आरक्षणाच्या अंतर्गत नोकरीसाठी पात्र प्रकल्पग्रस्तांना प्रमाणपत्रे देण्यात आली असून ती पुढील पिढीसाठी हस्तांतरणीय (ट्रान्सफरेबल) करण्यात आली असल्याचेही मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.

# राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या प्रचार-प्रसिध्दी चित्ररथाचा हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रसिध्दी मोहिमेची सुरुवात

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२०२६ अंतर्गत विविध विभागाच्या कल्याणकारी योजनांची तसेच जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) सन २०२५-२०२६ अंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती व जनजागृती होण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय जालना यांच्या वतीने आयोजित डिजिटल चित्ररथाला आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रचार-प्रसिद्धी मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. हे चित्ररथ जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागात जाऊन प्रचार-प्रसिध्दी करणार असुन, यामुळे नागरिकांना तसेच लाभार्थ्यांना या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळणार असुन, या योजनांचा लाभ घेण्यास देखील मदत होणार आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मुख्यमंत्री बळीराजा शेत/पांदण रस्ते योजना, पीएम सुर्यघर मुफ्त बीजली योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, बालविवाह प्रतिबंध कायदा:२००६, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या योजनांचा समावेश आहे.

तसेच जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) अंतर्गत कर्मवीर दादासाहेब गायकवाड



सबळीकरण व स्वाभिमान योजना, अनुसूचित जातीतील लाभार्थींना शेळ्या/मेढ्यांचे गट व दुभत्या जनावरांच्या गटाचा पुरवठा करणे, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, सौर उर्जा संयंत्र बसविणे, ग्रामीण भागातील महिलांना विविध साहित्य पुरविणे या योजनांचा समावेश आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना (नवीन विहिर व जुनी विहिर दुरुस्ती), अनुसूचित जातीतील लाभार्थींना शेळ्या मेढ्यांचे गट व दुभत्या जनवरांच्या गटाचा पुरवठा करणे, रमाई आवास योजना (शहरी व ग्रामीण) आणि अनुसूचित जाती व नवबौध्द मुलां-मुलींकरीता तालुकास्तरावर १०० शासकीय निवासी शाळा या योजनांवर आधारित भित्तीपत्रिकांचे देखील यावेळी मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. तसेच या डिजिटल चित्ररथाद्वारे जिल्हा माहिती कार्यालय, जालना यांनी तयार केलेल्या बालविवाह मुक्त जालना, वन स्टॉप सखी सेंटर, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना आणि अनुसूचित जातीतील नागरिकांसाठी गटई स्टॉल योजना या योजनावर आधारित लघु माहितीपट देखील दाखवून प्रचार प्रसिध्दी करण्यात येणार आहे.

जालना जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ, लघु माहितीपट आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी सूचित कुलकर्णी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता स्मिता पवार, समाज कल्याण विभागाचे वरिष्ठ निरिक्षक गणेश अंभोरे, जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी, साक्षी उगले, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानान इंगळे, संरक्षण अधिकारी श्री. कुलकर्णी, संतोष मुसळे, उपसंपादक (अ.का.) मिलींद तुपसमिंद्रे, श्रीमती पुष्पा धनाईत, प्रतिभा इंगळे, विष्णु जायभाये, संतोष पाखरे, महिला बाल विकास विभाग आणि सखी वन स्टॉप सेंटरचे कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

## श्री. विनोद बापूराव धोत्रे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ७५ पुस्तकांपासून 'The Visionary's library' लोकार्पण सोहळा

**जालना । प्रतिनिधी**

धोत्रे कुटुंबाचे आधारस्तंभ, समाजजीवनातील प्रेरणास्थान आणि ज्ञानसेवेचे अखंड उपासक असलेल्या श्री. विनोद बापूराव धोत्रे ७५वा वाढदिवस दिनांक १ मार्च २०२६ रोजी नुकताच हॉटेल सागर इन येथे अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. अमृतमहोत्सवी वाढदिवस साजरा करताना त्यांच्या कार्याचा गौरव करत समाजातील मान्यवर, नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री विनोद बापूराव धोत्रे यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून धोत्रे घराण्याला नावारूपास आणले. त्यांनी लहानपणापासूनच वेगवेगळ्या प्रकारची कामे जसे शिलाई काम, लिखाण काम, पेंटिंग काम, कागदाचे पाकिटे बनवणे, पुस्तक विकणे, चहाचे हॉटेल चालवणे इत्यादी कामे करता करता शासकीय नोकरीही पत्करली तसेच आपल्या २ बहिणीं, आई - वडिलांचा सांभाळ करत व ४ भाऊ व पत्नी यांना शासकीय नोकरीस लावले व स्वतः ३९ वर्षे शिक्षक व केंद्रप्रमुख म्हणून शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. यानंतरही त्यांचे काम थांबले नाही सध्या ते निवृत्त शिक्षक संघटनेचे अध्यक्ष आहेत व जुना जालना भावसार समाजाचे अध्यक्ष आहेत. सतत समाजाला काही ना काही तरी देण्याची भावना त्यांच्या मनात होती हेच औचित्य साधून त्यांच्या अमृतमहोत्सव वाढदिवसाच्या विशेष प्रसंगी ज्ञानसंवर्धनाच्या त्यांच्या दीर्घ स्वप्नाला साकार रूप देत 'द व्हिजनरी लायब्ररी' चा लोकार्पण सोहळाही पार पडला.

शिक्षण आणि वाचनसंस्कृती यांचा प्रचार-प्रसार व्हावा, या उदात्त हेतूने या ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली, व्यक्तिमत्व विकास वरील जागतिक दर्जाची मराठी व हिंदी भाषेतील समृद्ध पुस्तकसंग्रह निवडण्यात आला. श्री. विनोद बापूराव धोत्रे यांनी



आपल्या आयुष्यात प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा आणि समाजसेवा या मूल्यांचा अवलंब केला. त्यांच्या दूरदृष्टीमुळे अनेक सामाजिक उपक्रमांना दिशा मिळाली. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या त्यांच्या ठाम विश्वासातूनच 'द व्हिजनरी लायब्ररी' ची संकल्पना साकार झाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. विनोद बापूराव धोत्रे सत्कार करण्यात आला. नातेवाईक, आप्तेष्ट मित्र मंडळ व मान्यवरांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि कार्याचे कौतुक करत त्यांच्या दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. उपस्थितांनी त्यांच्या आयुष्यप्रवासाचा आढावा घेत त्यांच्या प्रेरणादायी आठवणींना उजाळा दिला. 'द व्हिजनरी लायब्ररी' चे लोकार्पण करताना त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, वाचनामुळे विचारांना चालना मिळते आणि विचारांमुळे समाज प्रगत होतो. त्यांच्या या शब्दांनी उपस्थितांना नवचैतन्य मिळाले. श्री. विनोद धोत्रे यांचा ७५वा वाढदिवस आणि 'द व्हिजनरी लायब्ररी' चा शुभारंभ हा केवळ आनंदाचा क्षण नव्हे, तर समाजासाठी नवे ज्ञानदालन खुले होण्याचा ऐतिहासिक दिवस ठरला. त्यांच्या कार्याचा वारसा पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहील, यात शंका नाही. अमृतमहोत्सवी वाढदिवस साजरा करणाऱ्या श्री. विनोद धोत्रे यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि सतत समाजसेवेची ऊर्जा लाभो, हीच सर्वांची सदिच्छा. या लायब्ररीचा लाभ घेण्यासाठी आपण श्री. व सौ. उषा विपुल धोत्रे यांना ९८९०००४७३०, ७५८८५६२६३८ वरील नंबर वर संपर्क करावा.

## जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर पेट्रोल-डिझेलचा राखीव साठा ठेवण्याचे आदेश

**जालना । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील सर्व पेट्रोलपंप चालकांनी पेट्रोल व डिझेलचा किमान राखीव साठा कायमस्वरूपी उपलब्ध ठेवावा, असे निर्दे श जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी दिले आहेत.

सार्वजनिक वितरण व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत राहणे अत्यावश्यक असल्याने इंधन पुरवठा व्यवस्थेत कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. नैसर्गिक आपत्ती, संप, वाहतूक अडचणी किंवा इतर अनपेक्षित परिस्थितीत इंधन टंचाई निर्माण होऊ नये आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागू नये, यासाठी पेट्रोल पंपांवर दैनंदिन विक्रीचा विचार करून किमान साठा ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, संबंधित पेट्रोलपंप चालकांनी साठ्याची नोंद अद्ययावत ठेवून, ती तपासणीसाठी उपलब्ध करून द्यावी. आपत्कालीन परिस्थितीत शासकीय यंत्रणांना प्राधान्याने इंधन पुरवठा करणे आवश्यक राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. या सूचनांचे पालन न केल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे ही जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी कळविले आहे.

## प्रत्येक गावातील नागरिकांच्या प्रलंबित समस्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराच्या माध्यमातून सोडविणार - विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**जालना । प्रतिनिधी**

महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा १ आयोजित करण्यात येणार आहे. या कालावधीत आयोजित शिबीरादरम्यान प्रत्येक गावातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनातील सर्व यंत्रणांनी प्रयत्न करावेत असे निर्देश छत्रपती संभाजी नगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले. आज दि. ०४ मार्च २०२६ रोजी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर विभाग जितेंद्र पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली जालना जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसंरपंच यांची छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराबाबत आयोजित दुरभाष्य परिषदेत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

या दुरभाष्य परिषदेस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना शिरीष बनसोडे, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, सर्व उप विभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत, सर्व गटविकास अधिकारी यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलतांना विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर म्हणाले की, प्रत्येक गावातील नागरिकांच्या महसूल व इतर शासकीय योजनांशी संबंधित प्रलंबित समस्या या शिबिरांच्या माध्यमातून तात्काळ सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी संबंधित गावातील नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्या, अडचणी, तक्रारी ह्या मंडळ अधिकारी यांच्याकडे देणे बंधनकारक राहील. संबंधित मंडळात ज्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरांचे आयोजन केले जाणार आहे त्या दिवशी संबंधित विभागाचे अधिकारी या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. तसेच या शिबीरा दरम्यान महाराष्ट्र शासनाकडून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी व शासकीय योजना सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी तसेच लोकाभिमुख प्रशासनासाठी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय व योजनांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यात यावी.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले की, जालना जिल्ह्यात एकूण ६५ ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्यात येणार असून मंडळ स्तरावर या शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक शिबिरात महसूल, ग्रामविकास, पंचायत राज, सामाजिक न्याय, कृषी, आरोग्य आदी विभागांचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या अर्जांची तत्काळ दखल घेतील. ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत मंडळ व नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर राबविण्यात येणार असून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांचे महसूल विषयक प्रश्न तात्काळ निकाली काढणे हा प्रमुख उद्देश आहे. प्रत्येक तालुक्यात एकदिवसीय समाधान शिबिरे आयोजित करून प्रलंबित फेरफार, ७/१२ दुरुस्ती, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्रे यांसारख्या सेवा 'सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी' तत्त्वावर देण्यात याव्यात, असे त्यांनी निर्देशित केले. अभियानाच्या पूर्वतयारीत गावनिहाय प्रलंबित प्रकरणांची यादी तयार करून शिबिरापूर्वी आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करावी. ७/१२ व ८अ उताऱ्यांचे अद्ययावतीकरण, डिजिटल ७/१२ ची जनजागृती, तसेच एकवेळच्या अधिमूल्य भरणा पद्धतीबाबत नागरिकांना मार्गदर्शन करावे. तुकडेबंदी कायद्याशी संबंधित प्रकरणे, संपादन व अकृषी परवानगी नोंदींची अद्ययावत माहिती शिबिरात उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी सांगितले. तसेच 'एक खिडकी व्यवस्था' प्रभावीपणे राबवून सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध राहतील याची दक्षता घ्यावी. शिबिरांची व्यापक प्रसिद्धी करून जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, यासाठी सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे व दवंडीचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**जिल्हातील शिबीरांचे ठिकाण व दिनांक :-**

७ मार्च २०२६ - जालना- देवमूर्ती, बदनापूर-बावणे पांगरी, अंबड-जामखेड, घनसावंगी-कुंभार पिंपळगाव, परतुर- आष्टी, मंठा- पांगरी गोसावी,भोकरदन- राजुर, जाफ्राबाद-माहोरा

१४ मार्च २०२६- जालना- नेर, बदनापूर-रोषणगाव, अंबड-धनगर प्रिंप्री, घनसावंगी-राणी उंचेगाव, परतुर- श्रीष्टी, मंठा-तळणी, भोकरदन-जानेफळ दाभाडी, जाफ्राबाद-कोळेगाव .

२२ मार्च २०२६-जालना- सावंगी तलाव, अंबड-शहागड, घनसावंगी- रांजणी, भोकरदन- धावडा.२८ मार्च २०२६-जालना-विरेगाव, बदनापूर-शेलगाव, अंबड- वडीगोद्री, भोकरदन- आव्हाना.

६ एप्रिल २०२६- जालना- रामनगर, भोकरदन-पिंपळगाव रेणुकाई

१० एप्रिल २०२६-जालना- वाघ्रुळ जहागीर, बदनापूर- चिखली, अंबड-ताड हदगाव, घनसावंगी-पानेवाडी, परतुर- वाटुर, मंठा-ढोकसाळ, भोकरदन-केदारखेडा, जाफ्राबाद- टेंभुर्णी

१७ एप्रिल २०२६- जालना- पाचन वडगाव, बदनापूर- दाभाडी, अंबड-गोंदी, घनसावंगी-अंतरवाली टेंभी, परतुर- सातोना खुर्द, मंठा- माळतोंडी, भोकरदन- हसनाबाद, जाफ्राबाद- वरुड बुद्रुक.

२४ एप्रिल २०२६-जालना-सेवली, बदनापूर-ग्रामीण, अंबड-सुखापुरी, घनसावंगी-जांब समर्थ, परतुर- परतुर ग्रामीण, मंठा- जयपूर, भोकरदन-दानापूर, जाफ्राबाद- कुंभारझरी.

२ मे २०२६- जालना- गोलापांगरी, अंबड-रोहिलागड, परतुर-कोकाटे हदगाव, मंठा- मंठा शहर, भोकरदन- सिपोरा बाजार.

८ मे २०२६- जालना मनपा, बदनापूर नगर पंचायत, नगर परिषद अंबड, नगर पंचायत तिर्थपुरी, नगर परिषद परतुर, नगर पंचायत मंठा, नगर परिषद भोकरदन, नगर पंचायत जाफ्राबाद.

१५ मे २०२६ नगर पंचायत घनसावंगी, भोकरदन-आन्वा

जिल्हातील सर्व नागरिकांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**